सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जिल्हा परिषद, नाशिक - ४२२१०१**

**दुरध्वनी क्र. ०२५३-२४६१९०९** **Email- kumbhmela.२०२७@mah.gov.in**

जा.क्र.नात्रिकुंप्रा/प्र.मा. /२७७/२०२६/ दिनांक -स्वाक्षरी खाली नमूद आहे.

**प्रशासकीय मान्यता आदेश :-**

**विषय:-** नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ करीता विकास कामांकरीता प्रशासकीय मान्यता आदेश.

**कामाचा तपशिल:-** नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ च्या आयोजनाकरीता आवश्यक माहिती व तंत्रज्ञानविषयक कामे (०४ कामे)

**प्र. मा. रक्कम:- रु.१.१८ कोटी**

**संदर्भ:-** १) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दिनांक २१/०७/२०२६.
२) या कार्यालयाचे पत्र दिनांक २९/०७/२०२५.
३) शासनाचे पत्र क्रमांक कुंभमे-२०२५/प्र.क्र.२३५/नवि-२५ दिनांक २९/०८/२०२५.
४) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ ची शिखर समितीची बैठक दि.१३/०३/२०२६
५) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक- प्रस्ताव

Scan me

**वाचा** - नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम, २०२५ चे कलम ७ (१) (ग).

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या दिनांक २१/०७/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता मिळाल्याप्रमाणे संदर्भ क्र. ५ च्या मागणीनुसार नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२८ च्या आयोजनासाठीच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या खालील कामांना नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ चे कलम ७ (१) (ग) नुसार नमूद केलेल्या अटी शर्तीच्या अधीन राहून खालील प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा :- नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण कार्यालय**

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता रक्कम (रुपये कोटी) | बैठकीत मंजुर विषय क्र | काम पूर्ण करण्याची मुदत | अंमलबजावणी अधिकारी/ यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुंभमेळा दूरसंचार क्षमतेसाठी ड्राईव्ह टेस्ट सर्वेक्षण करणे | **०.१०** | ११ | आवश्यकते प्रमाणे | तहसिलदार, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| २ | नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात RF नियोजन (RF Planning) करणे | **०.१२** | १२ | | |
| ३ | कुंभ एआय सँडबॉक्ससाठी इंडिया-एआय मिशन अंतर्गत एआय कम्प्युट संसाधने मिळवणे | **०.८६** | १३ | | |
| ४ | प्राधिकरणाचा लोगो व "महासिंहस्थ" नावाच्या ट्रेडमार्कची नोंदणी करणे | **०.१०** | आयत्या वेळचा विषय-०१ | | |
| | **एकूण** | **१.१८** | | | |

प्रशासकीय मान्यता आदेश

जा.क्र. नात्रिकुंप्रा/प्र.मा. /२७७/२०२६/ दिनांक -स्वाक्षरी खाली नमूद आहे.

**प्रशासकीय मान्यता रक्कम- (४ कामे)- रक्कम रु. १.१८ कोटी**

**(अक्षरी रुपये एक कोटी आठरा लक्ष फक्त)**

अनुदाने (वेतनेतर) (००) (००) (९७) सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी यावरील खर्चाकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) कुंभमेळा निधी संबंधित शीर्षातून देण्यात येत आहे. तथापि शासनस्तरावर किंवा प्राधिकरणात इतर शीर्षातून किंवा योजनेतून सदरचा खर्च करण्याचा निर्णय झाल्यास त्याप्रमाणे निधी उपलब्ध केला जाईल.

२९. या आदेशाद्वारे मंजूर कामाकरीता आहरण व संवितरण अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, कार्यालय नाशिक हे राहतील तरी त्यांनी सदर कामाकरीता प्राप्त होणारा निधी आहरीत करुन संबंधितांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

३०. सर्व संबंधित विषय तज्ञ व सल्लागार व्यक्ती व संस्था यांचेकरीता नियुक्तीची शासन निर्णय/सुचना/ प्रक्रिया राबवुन आवश्यकतेप्रमाणे स्वतंत्र नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही संबंधित विभाग (आस्थापना शाखा) करावी. तसेच संबंधितांची देयके वेळोवेळी लेखा शाखेस सादर करण्याची कार्यवाही करावी. याबाबत कोणताही वाद/ लेखाआक्षेप/न्यायालयीन चौकशी इत्यादी उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

३१. या आदेशान्वये मान्यता देण्यात येणा-या कामाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करताना नियुक्तीच्या अटी व शर्ती/ करारनामा इत्यादीचा तपशिल या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदर कामाकरीता शासनाने दिलेल्या विशेष सुचना तसेच या आदेशातील अटी व शर्तीचा समावेश नियुक्ती करारनाम्यात करण्याची जबाबदारी अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. याबाबत कोणताही वाद/ लेखाआक्षेप/न्यायालयीन चौकशी इत्यादी उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

३२. या आदेशान्वये मान्यता देण्यात येणा-या कामाच्या अनुषंगाने व्यक्ती अथवा संस्थेची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची व प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार सेवा स्वरुपाची आहे. तरी संबंधितांची सेवा प्राधिकरण कधीही समाप्त करु शकते व याबाबत प्राधिकरणाचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही व पुरविण्यात आलेल्या सेवेच्या अनुरुपच देयक अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी व तसे संबंधितांच्या नियुक्ती आदेशात नमूद करण्याची खबरदारी नियुक्ती आदेश निर्गमित करणा-या शाखेकडुन घेण्यात यावी.

३३. या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात येणा-या संस्थेला नेमून दिलेल्या कामांकरीता लागणारी आवश्यक रक्कमेला या कार्यालयाकडुन पुर्वमंजुरी घेऊनच सदरचे काम करणे अनिवार्य आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही कामास कार्योत्तर मंजूरी प्रदान करुन देयक अदा करण्यात येणार नाही याची खात्री नियुक्ती करणा-या अंमलबजावणी अधिकारी यांनी करावी. संस्थेकडुन प्राप्त देयके अंमलबजावणी अधिका-यांच्या मान्यतेने (पुर्वमंजुरीच्या तपशिलासह) या कार्यालयास देयके सादर केल्यानंतरच या कार्यालयाकडुन वित्तीय कार्यप्रणालीनुसार निधी वितरण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रशासकीय मान्यता- आदेश

Digitally signed by
SHEKHAR SINGH
Date: 10-08-2026
11:08:24

Scan me

**शेखर सिंह** (भा.प्र.से)
**कुंभमेळा आयुक्त,**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक**

प्रत- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव-

१. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण कार्यालय (आस्थापना)

२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, कार्यालय नाशिक